# आश्वासक! पूर्व हवेलीचा चेहरामोहरा झपाट्याने बदलतोय

**ऊस, पेरु, सर्व प्रकारचा भाजीपाला पिकवणाऱ्या व परंपरागत शेती व्यवसाय असलेल्या पूर्व हवेलीत गेल्या काही वर्षात नागरीकरणाचा वेग प्रचंड प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे शेती खालील क्षेत्र कमी होऊन बांधकामे वाढू लागली आहेत. दहा-वीस वर्षांपूर्वी कुणी म्हटले असते की, आगामी काळात असे होणार आहे, तर सर्वांनी त्याला वेड्यात काढले असते. परंतु, त्या वेड्याचे भविष्य खरे ठरले असून वेगवेगळ्या कारणांमुळे नागरीकरण वाढलेल्या पूर्व हवेलीत आगामी दहा वर्षांत प्रचंड बदल होणार आहेत. स्थानिक नागरिकांनी त्या दृष्टीने स्वत:मध्ये बदल करणे आवश्यक आहे. अन्यथा विकासाच्या या वेगवान एक्सप्रेस गाडीमध्ये त्यांना बसता येणार नाही.**



पुणे हे भारताच्या दख्खन पठारावरील महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे शहर आहे. पुणे हे भारतातील सर्वात मोठ्या आयटी हबपैकी एक असून भारतातील सर्वात महत्वाचे ऑटोमोबाईल आणि उत्पादन केंद्रांपैकी एक आहे. येथील उच्च दर्जाच्या शैक्षणिक संस्थांमुळे पूर्वेकडील ऑक्सफर्ड. म्हणून संबोधले जाते. भारतातील सर्वात राहण्यायोग्य शहर म्हणून पुण्याला वेगळेच स्थान आहे. पुणे शहराच्या लोकसंख्येत गेल्या २० वर्षांपासून मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. पुणे हे देशातील सातवे मोठे शहर आहे. परंतु, पुण्याच्या शहरी अर्थव्यवस्थेचा क्रमांक सहावा आहे. पुण्याचा दरडोई उत्पन्नाबाबत पहिला क्रमांक लागतो. ऐतिहासिक काळात पुण्यावर राष्ट्रकूट राजघराणे, अहमदनगर सल्तनत, मुघल, आदिल शाही घराणे यांनी राज्य केले असून १८ व्या शतकात हे शहर मराठा साम्राज्याचा भाग होते.

पुणे हे महत्त्वाचे औद्योगिक केंद्र असून म हाराष्ट्रात मुंबई नंतर पुणे सर्वाधिक औद्योगिकीकरण झालेले शहर आहे. अजूनही पुणे शहराचा विकास वेगाने होत आहे. पुण्यात माहिती-तंत्रज्ञान उद्योग विस्तारत आहे. पुणे हे कॉल सेंटर किंवा बीपीओ उद्योगात देखील अग्रेसर आहे. त्यामुळे पुणे शहर व परिसराची लोकसंख्या गेल्या वीस वर्षांत प्रचंड वाढली आहे. देशभरातील नागरिक नोकरी - व्यवसायाच्या निमित्त पुणे परिसरात राहायला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे घरांच्या मागणीत गेल्या काही वर्षांत खुपच वाढ झाली आहे. पुणे शहराच्या वाढीला ठराविक मर्यादा असल्याने पिंपरी-चिंचवड परिसरात नागरीकरण वाढले. तेथील जागांचे भाव वाढल्याने पुणे शहराच्या पश्चिम दिशेला नागरिकांची वस्ती वाढू लागली. सर्वात शेवटी पुणे शहराच्या पूर्व भागात म्हणजेच पूर्व हवेलीत लोकवस्ती वाढत आहे.

पुणे शहराच्या सभोवतालच्या इतर भागांशी तुलना केली असता पूर्व हवेलीत अजूनही मोकळ्या जागा भरपूर असल्याने आगामी वीस वर्षांमध्ये या भागात लोकसंख्या वाढणार आहे. हे लक्षात घेऊनच या परिसरात वेगवेगळ्या व्यावसायिकांनी छोटे मोठे गृहनिर्माण प्रकल्प सुरु केले आहेत. यातील काही प्रकल्प तर तब्बल ४००-५०० एकरात आहेत. या भागातील प्रकल्पांना ग्राहकांचा प्रतिसाद ही चांगला आहे. रिव्हर व्ह्यु सिटी, कुमार, जॉयव्हिला असे वेगवेगळ्या नामांकित व्यावसायिकांचे मोठमोठे गृहनिर्माण प्रकल्प सध्या सुरु आहेत किंवा सुरु होण्याच्या मार्गावर आहेत. एकंदरीत पूर्व हवेलीत ग्राहकांना वेगवेगळ्या गृहनिर्माण प्रकल्पांमुळे नागरिकांना भरपूर पर्याय उपलब्ध होत आहेत.

देशातील किंवा महाराष्ट्रातील बहुतेक छोट्या मोठ्या शहरात वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण झाला आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी बऱ्याच शहरांच्या कडेने रिंग रोड तयार करण्यात आलेले आहेत. मात्र, पुणे शहराला अजून एकही रिंगरोड मिळालेला नाही. १९८७ साली पुणे महानगरपालिकेत रिंग रोड तयार करावा म्हणून ठराव मंजूर करण्यात आला होता. गेली ३८ वर्षे हा रिंग रोड प्रत्यक्षात आला नाही. त्यामुळे पुणे शहर आणि सभोवतालच्या परिसरात वाहतूक कोंडीचा प्रश्न गेली अनेक वर्ष आहे. कागदावर दोन रिंग रोड तयार आहेत. मात्र प्रत्यक्षात एकही रिंग रोड तयार झाला नाही. आता मात्र त्या दृष्टीकोनातून पावले पडत असल्याचे सकारात्मक चित्र दिसत आहे. हा रिंग रोड प्रत्यक्षात अंमलात येईल, त्यावेळी येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न संपुष्टात येईल, अशी आशा आहे.

पुणे शहर भारताच्या इतर महत्त्वाच्या शहरांशी रस्ता, रेल्वे व हवाईमार्गाने चांगल्या प्रकारे जोडले गेले आहे. पुणे विमानतळावरून देशात व परदेशात जाण्याची सोय आहे. तरीही हा विमानतळ संरक्षण दलाच्या मालकीचा असल्याने नवीन विमानतळ बांधण्याचे नियोजन करण्यात येत आहे. नवा ग्रीनफिल्ड पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प महाराष्ट्र सरकार सुरू करणार असून तो पुरंदर तालुक्यात होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पाची जबाबदारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सोपविण्यात आली आहे.

हडपसर ते यवत पर्यंत उन्नत महामार्ग बांधायला राज्य सरकारने नुकतीच मान्यता दिली असून यासाठी सव्वा पाच हजार कोटी रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला आहे. तसेच स्वारगेट ते हडपसर मेट्रो लोणी काळभोर पर्यंत आणण्याचा शब्द उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांनी दिला आहे. ही मेट्रो यवत पर्यंत न्यावी अशी मागणी दौंडचे आमदार राहुल कुल यांनी केली आहे. उन्नत महामार्ग व मेट्रो झाल्यानंतर या परिसरातील वाहतूक कोंडी पुर्णपणे संपुष्टात येईल, अशी अपेक्षा तज्ञांनी व्यक्त केली आहे.

पुणे ते नाशिक या मार्गावरून जाणारी हायस्पीड रेल्वेमार्ग ही पूर्व हवेलीतील गावांमधून जाणार आहे. त्याचबरोबर पुणे ते दौंड या लोहमार्गावर पुणे ते लोणावळा सारखी लोकल सुरु करावी, यासाठी लोकप्रतिनिधी प्रयत्न करत आहेत. या प्रयत्नांना यश आल्यास दौंड वरुन लोणावळा व पुढे मुंबई पर्यंतचा प्रवास रेल्वेने करणे सुखकर होणार आहे. नोकरी, व्यवसाय व शिक्षणासाठी प्रवास करणा-यांना त्यामुळे फायदा होणार आहे.

एकंदरीत नवनवे गृहनिर्माण प्रकल्प, रिंग रोड, विमानतळ, उन्नत महामार्ग, मेट्रो, पुणे - नाशिक हायस्पीड रेल्वेमार्ग, पुणे - दौंड लोकल, आयटी हब, ऑटोमोबाईल हब आदी कारणांमुळे पूर्व हवेलीचा चेहरामोहराच आगामी काळात बदलणार आहे. शेती हा मुळ व्यवसाय असलेल्या भागात आधुनिकतेचे वारे वाहणार आहे. या आधुनिकतेच्या वाऱ्याच्या दिशेचा अंदाज घेऊन आपले धान्य उफणावे लागणार आहे. या वाऱ्याचा अचूक अंदाज बांधत आपण योग्य ठिकाणावर शांत उभे रहावे लागणार आहे. या वाऱ्याचा अंदाज घ्यायला आपण चुकलो, तर पुढच्या शंभर पिढ्या आपल्याला माफ करणार नाहीत. म्हणून आधुनिकतेच्या वाऱ्याचा योग्य अंदाज घ्या, शांत रहा, प्रगती करा, एकमेकांना मदत करा, उतमात करु नका, नाती जपा, पैशापेक्षा नाती श्रेष्ठ आहेत.

- **राजेंद्र उर्फ बापूसाहेब काळभोर,**
(अध्यक्ष - प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघ, पुणे जिल्हा)

हिमालया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल

मोफत मोफत मोफत..!
प्रथम वर्धापन दिनानिमित्त, दिनांक - ०७/०७/२०२५ ते ११/०७/२०२५
वेळ सकाळी १० ते २ वाजता. मोफत तपासणी शिबीर

अस्थी रोगतज्ज्ञ
स्त्री रोगतज्ज्ञ



डॉ. संदीप खरात
MBBS, DNB,DO
Consultant Orthopaedic Surgeon



डॉ. डेजी खरात
MBBS, MS, DNB, FICOG
Fellowship in IVF

डिस्काउंट
सोनोग्राफी - ₹799*
पॅथॉलॉजी - 20%
मेडिसिन - 10%
X-RAY - 30%

मोफत तपासणी शिबीर

- अद्यावत ऑपरेशन थिएटर
- प्रसूती विभाग
- प्रायव्हेट - सेमिप्रायव्हेट रूम
- सांधेरोपन (खुबा व गुडघा) सवलतीच्या दरात
- स्पीच थेरपी
- २४ तास आपत्कालीन सेवा

डिलिव्हरी *
नॉर्मल प्रसूती - ₹१८०००
सिझेरियन प्रसूती - ₹३५०००

- ३० बेडचे सुसज्ज हॉस्पिटल
- I.V.F सल्ला
- I.C.U व्हेंटिलेटर सुविधा
- हृदयरोग, डायबेटिज, उच्च रक्तदाब निदान व उपचार
- कॅशलेस मेडिक्लेम सुविधा
- सोनोग्राफी
- डिजिटल X-RAY
- मूत्रविकार,हर्निया,अपेंडिक्स निदान व उपचार

कांचन प्लाझा, पहिला मजला, शिंदवणे रोड, उरुळी-कांचन, पुणे
Book Appoinment +91 7250501003 / +91 98716 26384

।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ।।
-शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे
श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

पुणे प्राईम न्यूज
दै.पुणे प्राईम न्यूज'च्या पहिल्या अंकाच्या प्रकाशनाला
हार्दिक शुभेच्छा









शुभेच्छुक
पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, लोणी काळभोर, तालुका: हवेली, जिल्हा पुणे

HP GAS your friendly gas
PASHANKAR GAS AGENCY
जी हाँ!

FESTIVAL OFFER



Four Burner Glass Top
Trolly + Apron (560/-)
₹4900/-*



Three Burner Glass Top
Trolly + Apron (560/-)
₹4500/-*



Three Burner Steel Top
Apron (350/-)
₹3700/-*



Two Burner Glass Top
Trolly + Lighter (415/-)
₹3500/-*



Two Burner Glass Top
Trolly (210/-)
₹2350/-*



Two Burner Steel Top
Lighter + Refill (250/-)
₹2750/-*
*TC Apply

NEW CONNECTION RELEASED IN 5 MIN
लोणी काळभोर 9922000716/9822714747
शेवाळेवाडी 7875436060



# मोबाईल आणि आरोग्य

**आजच्या डिजिटल युगात मोबाईल फोन आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. एकवेळ मनुष्य काही काळ मुलभूत गरजा टाळेल पण मोबाईल फोनशिवाय राहणे केवळ अशक्यच. संपर्कापासून मनोरंजनापर्यंत आणि शिक्षणापासून व्यवसायापर्यंत मोबाईलने क्रांती घडवून आणली.**

तथापि विज्ञान हा शाप की वरदान या विषयाप्रमाणेच मोबाईल हेही दुधारी शस्त्रच... उत्तरही सारखेच.. तुम्ही वापर कराल तसा !!

सकारात्मकतेने बघितले तर मोबाईल फोनने माहिती दळणवळण क्षेत्रात प्रचंड प्रगती केली आहे. आरोग्य सेवेत अनेक सुधारणा घडवून आणल्या. नुकत्याच होऊन गेलेल्या कोव्हीड महामारीत आपण याचा अनुभव घेतला. अगदी कोव्हीड लसीकरणापासून ते औषधांबाबत डॉक्टरांचा सल्ला असो, सर्वच बाबतीत मोबाईलचाच उपयोग केला गेला.

आरोग्यविषयक ॲप्स मुळे लोकांना त्यांच्या फिटनेस वर लक्ष ठेवणे सोपे झाले. औषधांच्या वेळापत्रकानुसार आठवण करून देणे, आहाराविषयक जागरूकता, ह्या गोष्टी बऱ्याच प्रमाणात सोप्या झाल्या. ऑनलाईन डॉक्टरांकडून सल्ला जगभरात कोठेही उपलब्ध झाला. आरोग्य जनजागृती व साथीच्या आजारांबद्दल माहिती देण्यासाठी मोबाईलचा प्रभावी वापर केला जातो.

मात्र मोबाईलच्या अति वापरा मुळे अनेक मानसिक आजारांचे प्रमाण वाढत आहे. आपापसातील संवाद हरवत चालला. त्यामुळे नैराश्य, चिडचिडेपण, एकटेपणा, मुलांमध्ये एकाग्रतेने अभ्यास करण्याची क्षमता कमी होणे, मोबाईल शिवाय रहाण्याची भिती निर्माण होतेय.

मोबाईल घेऊन तासनतास एकाच जागेवर बसल्यामुळे शारीरिक हालचाली कमी होतात परिणामी लठ्ठपणा, क्रयशक्ती कमी होणे, व्यायामाचा अभाव, एकप्रकारचा सतत कंटाळा, यागोष्टी प्रामुख्याने दिसतात.

मोबाईल स्क्रीनमधून निघणाऱ्या निळा प्रकाश डोळ्यांसाठी अत्यंत घातक असतो. परिणामी डोळ्यांवर ताण येतो, दृष्टी कमी होते, डोळ्यांमध्ये कोरडेपणा येणे, झोप न येणे अशा समस्या उद्भवू शकतात,

मोबाईलच्या अति वापरामुळे बोटे दुखणे, खांद्यावर ताण येणे, पाठदुखी, कंबरदुखी यांसारख्या शारीरिक समस्या उद्भवतात. मोबाईल फोनमधून निघणाऱ्या रेडिएशनबद्दलही चिंता व्यक्त केली जात आहे.

आणखी धोकादायक ठरू पाहणारा प्रकार म्हणजे चालत्या दुचाकीवरून मोबाईल फोनवर बोलणे अनेक अपघातांना निमंत्रण देणारे आहे. पण याची चिंता कोणाला?

आपली कार असो वा दुचाकी, फोनवर बोलणे अत्यंत महत्त्वाचे असल्यास गाडी बाजूला घेऊन बोलणे, कधीही योग्यच पण आजकाल वेळ कोणाला, हाही मोबाईलचा दुरुपयोगच.

सारांश मोबाईल फोन हे एक दुधारी शस्त्र आहे त्याचे फायदे अनेक असले तरी, त्याच्या अति वापरामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. यावर उपाय म्हणून, मोबाईलचा वापर मर्यादित करणे, स्क्रीन टाईम कमी करणे, डोळ्यांना विश्रांती देणे आणि शारीरिक हालचालींवर लक्ष देणे गरजेचे आहे आधुनिक तंत्रज्ञानचा वापर आपल्या सोयीसाठी असावा, आपल्या आरोग्यासाठी धोकादायक नसावा हे कायम लक्षात ठेवावे, मोबाईल व आरोग्य यांच्यात संतुलन साधल्यास आपण या तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून घेऊ शकतो व निरामय जीवन जगू शकतो.

**- डॉ. समीर ननावरे,**
संचालक - गणराज हॉस्पिटल

# AI आणि सोशल मीडिया : वापरा, पण स्वतःला हरवू नका

आज आपण अशा युगात जगतो आहोत जिथे तंत्रज्ञान पूर्वीपेक्षा कितीतरी वेगाने धावत आहे. आपण ज्या पद्धतीने संवाद साधतो, व्यवसाय करतो, अभ्यास करतो आणि आपल्या भावना व्यक्त करतो, त्यात खूप मोठा बदल झाला आहे. भारतातील प्रत्येक गावात, शहरात आणि नगरात सोशल मीडियाने स्वतःचे स्थान पक्के केले आहे. लहान तालुक्यांमधील शेतकरी व्हॉट्सपवर पिकांची माहिती देतात, तर शाळकरी मुले इन्स्टाग्रामवर शैक्षणिक रील्स पाहतात. अशा प्रकारे डिजिटल जग आपल्या रोजच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. या शक्तिशाली बदलासोबतच, एक दुसरी अदृश्य शक्ती हळूहळू वाढत आहे ती म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता, अर्थात AI (आर्टिफिशियल इंटेलिजन्स).

AI आता फक्त अभियंते किंवा वैज्ञानिकांपुरता मर्यादित विषय राहिलेला नाही. तो आपल्या आजूबाजूलाच आहे मेसेज टाइप करताना मिळणाऱ्या सूचनांमध्ये, ॲप्सवर मिळणाऱ्या ऑटोमॅटिक उत्तरांमध्ये आणि सोशल मीडियावर वापरल्या जाणाऱ्या फिल्टर्समध्येही. AI च्या वाढीमुळे उत्साह आणि संभ्रम दोन्ही निर्माण झाले आहेत. काही लोक याने खूप प्रभावित झाले आहेत; त्यांना AI एक चमत्कार वाटतो जो काहीही करू शकतो. तर काही लोकांना भीती वाटते की ख



त्यांच्या नोकऱ्या किंवा कल्पनाशक्ती हिरावून घेईल. पण सत्य या दोन्हींच्यामध्ये आहे: ख आपला शत्रू नाही आणि तो आपला तारणहारही नाही. ते फक्त एक शक्तिशाली साधन आहे याहून अधिक काही नाही, कमीही नाही.

जर AI चा वापर काळजीपूर्वक आणि स्पष्ट हेतूने केला, तर तो लाखो लोकांचे जीवन सुधारण्यास मदत करू शकतो. तो शेतकऱ्यांना हवामानाचा अंदाज देऊन मदत करू शकतो, दुकानदारांना मार्केटिंग साहित्य बनवण्यासाठी सहकार्य करू शकतो आणि विद्यार्थ्यांना अवघड विषय सोपे करून लवकर शिकण्यास मदत करू शकतो. यामुळे व्यावसायिकांचा कामाचा ताण कमी होईल आणि लोकांना कामाच्या संख्येऐवजी गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करता येईल. विशेषतः ग्रामीण भारतासाठी, जिथे संसाधने अनेकदा मर्यादित असतात, AI अशा संधी उपलब्ध करून देतो ज्या एकेकाळी फक्त महानगरांपुरत्या मर्यादित होत्या.

परंतु हेच साधन गैरवापर केल्यास हानिकारक ठरू शकते. जर लोक प्रत्येक वाक्य, प्रत्येक डिझाइन किंवा प्रत्येक संदेशासाठी AI वर अवलंबून राहू लागले, तर आपण एक मौल्यवान गोष्ट गमावण्याचा धोका पत्करू आपला स्वतःचा आवाज. AI ला भावना कळत नाहीत. त्याला संस्कृती समजत नाही. त्याला दोन ओळींमधील अर्थ कळत नाही. ते फक्त पॅटर्न शिकते. आणि भारतासारख्या वैविध्यपूर्ण आणि भावनिक देशात, संदर्भाशिवाय केलेला संवाद धोकादायक ठरू शकतो. मशीन कदाचित एखाद्या संदेशाच्या दहा आवृत्त्या लिहू शकेल, पण त्यापैकी कोणती आवृत्ती मनाला स्पर्श करेल, हे फक्त माणूसच सांगू शकतो.

शिक्षण, राजकारण, आरोग्यविषयक संवाद आणि संस्कृती यांसारख्या क्षेत्रांमध्ये हे विशेष महत्त्वाचे आहे जिथे वेगापेक्षा बोलण्याची पद्धत (tone) जास्त महत्त्वाची असते. ख ने पटकन लिहिलेला एखादा चुकीचा संदेश गैरसमज किंवा अगदी अविश्वासही निर्माण करू शकतो. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की तंत्रज्ञान आपल्या क्षमता वाढवण्यासाठी आहे, आपली ओळख पुसून टाकण्यासाठी नाही.

AI मानवी नोकऱ्या हिरावून घेईल अशी वाढती भीती देखील आहे. ही भीती स्वाभाविक आहे, पण ती पूर्णपणे अचूक नाही. AI लोकांना कामावरून काढणार नाही तो अशा लोकांना बदलेल जे ख चा वापर करायला शिकणार नाहीत. जसा ट्रॅक्टरच्या आगमनाने शेतकऱ्यांचे अस्तित्व संपले नाही, तसेच ख मानवांना संपवणार नाही. तो फक्त त्यांना बक्षीस देईल जे स्वतःला जुळवून घेतील. भविष्य त्यांचे असेल जे मानवी विचार आणि तांत्रिक साधनांना एकत्र करतील.

आपण आपल्या तरुणांना फक्त AI वापरण्याचेच नाही, तर त्यावर प्रश्न विचारण्याचे, त्याला मार्गदर्शन करण्याचे आणि त्यात सुधारणा करण्याचे शिक्षण दिले पाहिजे. AI चा जबाबदारीने वापर कसा करावा हे शिकणे, हे वाचण्या-लिहिण्याइतकेच महत्त्वाचे मानले पाहिजे. AI जे काही सांगेल ते आंधळेपणाने कॉपी न करता, त्याला विचारांचा भागीदार म्हणून कसे वापरावे हे आपण त्यांना शिकवले पाहिजे.

आता आपल्याला संतुलनाची गरज आहे. एक शांत, विचारपूर्वक दृष्टिकोन. आपण भीतीपोटी AI ला पूर्णपणे नाकारू नये, किंवा त्याचा आंधळेपणाने स्वीकारही करू नये. आपण मधला मार्ग अवलंबला पाहिजे शिकणे, जुळवून घेणे आणि या तंत्रज्ञानाचा वापर शहाणपणाने आणि जबाबदारीने करणे. AI आणि सोशल मीडिया कुठेही जाणार नाहीत. पण त्यांच्यावरील आपले नियंत्रण टिकून राहिले पाहिजे. आपण बदलाचे नेतृत्व केले पाहिजे, बदलाने आपले नेतृत्व करू नये. या साधनांचा वापर करून आपण ग्रामीण भारताला वर आणूया, आपली अर्थव्यवस्था मजबूत करूया आणि आपली संस्कृती जपून ठेवूया.

कारण शेवटी, तंत्रज्ञान तेव्हाच सर्वोत्तम काम करते जेव्हा ते मानवतेची सेवा करते जेव्हा ते तिची जागा घेत नाही.

**लेखक : मल्हार पांडे,**
प्रभारी : सोशल मीडिया, महाराष्ट्र प्रदेश, भाजपा
संचालक : प्रावी कन्सलटन्ट्स













# पतसंस्था आणि त्यांच्या समोरील आव्हाने...

**महाराष्ट्र म्हणजे सहकार आणि सहकार म्हणजे महाराष्ट्र असे म्हटले तर वावगं ठरणार नाही. खऱ्या अर्थाने कै. यशवंतराव चव्हाण यांच्या मनातील सहकार इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रामध्ये जास्त नावारूपाला आला. त्यामध्ये कै. वसंतदादा पाटील, कै. वसंतराव नाईक, कै. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, कै. वैकुंठभाई मेहता, कै. धनंजयराव गाडगीळ यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. यांनीच सहकाराची पायाभरणी केली.**

१९०४ साली भारतामध्ये सहकाराची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यापूर्वी बडोदा येथे पहिली सहकारी पतसंस्था 'अन्नोन्य सहकारी मंडळी' या नावाने प्राध्यापक कवठेकर यांनी सुरू केली होती. प्राध्यापक कवठेकर हे लोकमान्य टिळकांचे वर्गमित्र होते. खरं सांगायचं तर वित्तीय संस्थांमध्ये पतसंस्थांचा नंबर अगदी शेवटी येतो म्हणजे आधी राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, सहकारी बँका आणि नंतर पतसंस्थांचा नंबर लागतो, त्यामुळे पतसंस्थांकडे येणारा ग्राहक वर्गही त्याच प्रकारचा अडला-नडलेला असतो. परंतु पतसंस्थांमध्ये मिळणारी ग्राहक सेवा ही अत्यंत चांगल्या प्रकारची असते. तुलनेने इतर वित्तीय संस्थांमध्ये त्या प्रकारे सेवा मिळत नाहीत.

पतसंस्था ग्राहकांना इतर बँकांप्रमाणेच सर्व प्रकारच्या सेवा देत असते. फक्त ठेवी स्वीकारणे व कर्ज देणे आणि नफा कमवणे हाच उद्देश पतसंस्थांचा राहिलेला नाही. पतसंस्था इतर खाजगी बँकांच्या सहाय्याने ग्राहकांना ई-पेमेंट्स, आरटीजीएस, एनईएफटी, एसएमएस सेवा देतात, बँकांकडून त्यांना ठ कोड सुविधाही उपलब्ध झाल्या आहेत.

सद्यस्थितीत पतसंस्था याच ग्राहकांशी मित्रत्वाच्या नात्याने मार्गदर्शकाच्या भूमिकेतून काम करताना दिसत आहेत व वित्तीय संस्थांमधील एक छोटा जबाबदार घटक म्हणून अधिक जबाबदारीने व सामाजिक बांधिलकी जपत काम करताना दिसत आहे. आजमितीस महाराष्ट्रामध्ये १६००० पेक्षा जास्त पतसंस्था असून, त्यांच्याकडे ९० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक ठेवी पतसंस्था चालकांच्या समाजात असलेल्या प्रतिष्ठेमुळे जमा झाल्या आहेत. त्यातूनच सर्वसामान्य गरजू लोकांना ७०% पेक्षा अधिक रकमेचे कर्ज वाटप केले जाते. परंतु




कर्ज वसुली वेळेवर न होणे ही सर्वात मोठी समस्या पतसंस्थांपुढे आहे, कारण शेतकरी, छोटे-मोठे व्यवसायिक हे दरमहा हप्ता भरू शकत नाहीत तसेच येणाऱ्या नैसर्गिक व नैमित्तिक आपत्कालीन अडचणींना सामोरे जावे लागते.

सहकारी पतसंस्थांना येणाऱ्या अडचणींचा विचार करता बँकांच्या प्रमाणात पतसंस्थांचा नफा हा कमी दिसून येतो. याची कारणमीमांसा करता, पतसंस्थांकडे निधी रूपाने येणारा पैसा हा मुख्यतः मुदत ठेवींचा असतो. पतसंस्थांना रिझर्व बँकेचे नियम लागू होत नाहीत, त्यामुळे 'निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट' लागू होत नाही आणि त्यामुळे चेक, ड्राफ्ट इत्यादी व्यापाऱ्यांना लागणाऱ्या सुविधा पतसंस्था उपलब्ध करून देऊ शकत नाहीत. त्यामुळे व्यापाऱ्यांचे चालू खाते, बचत खाते इत्यादी खाते सुरू होऊ शकत नाहीत आणि म्हणून कमीत कमी व्याजाची मोठी रक्कम म्हणजेच उड (कासा) डिपॉझिट संस्थांकडे येत नाहीत व त्यामुळे जास्त व्याजाच्या ठेवी संस्थांना स्वीकाराव्या लागतात.

आजच्या डिजिटल युगामध्ये पतसंस्थांना मार्केटिंग, जाहिरात, नेट बँकिंग इत्यादी सारख्या सुविधांचा वापर करण्यासाठी लागणारा खर्च मोठा असल्यामुळे तो खर्च करणे शक्य नसते व त्यांच्यामध्ये व्यवसायभिमुखतेचा अभाव हेही एक कारण आहे. तसेच त्यासाठी वेळोवेळी होणारे बदल स्वीकारणे तसेच संचालक, कर्मचारी वर्ग व सभासदही प्रशिक्षित असणे गरजेचे आहे. यासोबतच रिझर्व बँक व केंद्र शासनाच्या निर्णयामुळे खेडेगावातही आता नॅशनलाइज्ड बँका व खाजगी बँका पोहोचल्या आहेत व त्यामुळे त्यांच्याकडे असणारा व्यवसायाचा दृष्टिकोन व प्रशिक्षित सेवकवर्ग यामुळे अनेक छोट्या पतसंस्थांना कामांमध्ये अडचणी येत आहेत.

मध्यंतरीच्या काळामध्ये सहकार खात्याने ९७ वी घटनादुरुस्ती करून सहकारी पतसंस्थांच्या कामकाजामध्ये सुधारणा करण्यासाठी अनेक सुधारणा लागू केल्या, त्यामुळे कामकाजामध्ये सुसंगती येण्यास मदत झाली. महाराष्ट्रामध्ये सहकार मोठ्या प्रमाणावर स्थिरावलेला दिसून येतो, परंतु देशभरामध्ये गुजरात सोडले तर इतर राज्यांमध्ये सहकाराची कल्पना रुजलेली दिसत नाही. गेल्या पंचवार्षिकामध्ये केंद्र शासनाने वेगळा सहकार विभाग स्थापन केला असून त्याचे खाते केंद्रीय मंत्री माननीय अमित शहा यांच्याकडे देण्यात आले आहे. त्यामुळे केंद्राचाही सहकाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ खरे तर हे सहकाराचे ब्रीदवाक्य आहे. परंतु काही पतसंस्था अपप्रवृत्तीच्या लोकांमुळे अडचणीत आल्या व त्यामुळे अनेक चांगले काम करणाऱ्या पतसंस्थांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

सर्व पतसंस्थांना येणाऱ्या अडी-अडचणीवर सहकार खात्याबरोबर चर्चा करून मार्ग काढणे व पतसंस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन अत्यंत चांगल्या प्रकारे मदत करीत आहे. सध्या सहकारी बँकांना जसे ठेवींना विमा संरक्षण असते, त्याच धर्तीवर पतसंस्थांमधील ठेवींनाही विमा संरक्षण मिळावे यासाठी पतसंस्थांच्या वतीने फेडरेशन सहकार खात्याशी चर्चा करत आहे. त्यालाही लवकरच यश येईल अशी अपेक्षा आहे व त्यामुळे पतसंस्थांना ठेव संकलनास फायदा होईल. आमच्या संस्थेला राष्ट्रीय सहकारी विकास निगम (NCDC), सहकार मंत्रालय भारत सरकार यांच्या वतीने देण्यात येणारा पतसंस्था विभागातील राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा को-ऑपरेटिव्ह एक्सलन्स अँड मेरिट २०२३ अवॉर्ड मिळाला आहे, ही सहकारी पतसंस्थेसाठी निश्चित अभिमानाची बाब आहे.

२०२५ हे वर्ष संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. संयुक्त राष्ट्र संघाला अपेक्षित असलेली विकासाची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी सहकार क्षेत्राची भूमिका निश्चितच सहाय्यकारी ठरेल. म्हणूनच असे म्हटले जाते की, 'विना सहकार - नाही उद्धार!'

२०२५ आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

जय महाराष्ट्र ... जय सहकार....!

आपला,

**राजेंद्र ज्ञानोबा कांचन**
संस्थापक अध्यक्ष
(डॉ. मणिभाई देसाई सहकारी पतसंस्था मर्या. उरुळी कांचन)




# लोणी काळभोर येथे विठुनामाच्या गजरात रंगला रेनबो इंटरनॅशनल स्कूलचा पालखी सोहळा

**लोणी काळभोर, ता. ५ :** पावसाच्या सरी आणि विठ्ठलनामाच्या गजरात रेनबो इंटरनॅशनल स्कूल परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. विठ्ठल-रुक्मिणी, संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या प्रतिमेची पूजा व आरती करून पालखी सोहळ्याची सुरुवात करण्यात आली.

या भक्तिपूर्ण सोहळ्याचे उद्घाटन रेनबो इंटरनॅशनल स्कूलचे अध्यक्ष नितीन काळभोर, सेक्रेटरी मंदाकिनी काळभोर, मुख्याध्यापिका मीनल बंडगर, रेनबो कोहिनूर किड्सच्या प्राचार्या ऐश्वर्या काळभोर, उपप्राचार्य प्रशांत लाव्हरे, पर्यवेक्षिका पायल बोळे यांच्या उपस्थितीत पार पडले. पालखी सोहळ्यात इयत्ता पाचवीच्या विद्यार्थिनीने आकाशी झेप घे रे पाखरा हे भक्तिगीत सादर केले. संगीत शिक्षक कार्तिक गोरखे यांनी बघ उघडूनी दार या भक्तिगीताने वातावरण भारावून टाकले,



तर कला शिक्षक दीपक शितोळे यांनी विठ्ठलाचे लाईव्ह पेंटिंग साकारले.


विद्यार्थ्यांनी माऊली... माऊली... च्या गजरात या चित्राला साद दिली. संतांच्या वेशभूषेत पार्थ सुभेदार (विठोबा), संस्कृती सोले (रखुमाई) आणि अनुराग सावंत (संत तुकाराम) हे विद्यार्थी लक्षवेधी ठरले. त्यांच्या सादरीकरणामुळे रेनबो इंटरनॅशनल स्कूलमध्येच जणू विठ्ठल, रखुमाई आणि संत तुकाराम अवतरले असल्याचा भास निर्माण झाला.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते पालखी रिंगण! फलटणच्या रिंगणाची आठवण होईल असे हे सजीव चित्र इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी साकारले. रिंगणामध्ये मध्यभागी पालखी व विठ्ठल-रखुमाईची मूर्ती ठेवण्यात आली होती. दुर्गा नावाच्या आश्वावरून नेत्रा लाडे, प्रांजल काळभोर, दुर्वा बोळे व रिया दुगाणे यांनी घोडेस्वारी करत रिंगणाला फेऱ्या दिल्या. घोडेस्वारीचे विशेष मार्गदर्शन असिफ शेख यांनी केले.

दरम्यान, इयत्ता आठवीवीच्या विद्यार्थ्यांनी माऊली माऊली या गाण्यावर सादर केलेल्या नृत्याने रिंगण रंगतदार झाले. या नृत्याचे मार्गदर्शन शाळेचे नृत्य शिक्षक अश्विन मनगुतकर यांनी केले. शाळेतील शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्गाने देखील फुगड्या खेळत पावसात भिजून या सोहळ्याचा मनमुराद आनंद लुटला. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन शिक्षिका सौ. श्वेता मेटे यांनी केले.






# शांत संघर्ष पीसीओडीसोबत

## महिलांच्या आरोग्याकडे लक्ष देण्याची वेळ!

**देशभरातील बाह्यरुग्ण विभागांच्या (OPD) कॉरिडॉरमध्ये दररोज एक शांत पण सातत्यपूर्ण कथा ऐकायला मिळते. तरुण स्त्रिया अनियमित मासिक पाळी, अकारण वजन वाढणे, सततचा मुरूम (Pimples), केस गळणे आणि भावनिक थकवा यावर उत्तरे शोधत असतात. या काही वेगळ्या समस्या नाहीत; या अनेकदा सध्याच्या काळातील सर्वात कमी चर्चा झालेल्या, तरीही वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या हार्मोनल विकारांपैकी एक असलेल्या पॉलीसिस्टिक ओव्हेरियन डिसऑर्डर (PCOD) शी संबंधित आहेत.**

PCOD आता दुर्मिळ निदान राहिलेले नाही. प्रजननक्षम वयातील स्त्रियांच्या मोठ्या टक्केवारीवर परिणाम करणारा हा आजार केवळ स्त्रीरोग स्थितीपेक्षा अधिक काहीतरी दर्शवतो. हे आधुनिक शहरी जीवनातील ताण, जीवनशैलीतील बदल आणि पोषणविषयक असंतुलनाचे सूचक आहे.

आधुनिक काळातील एक साथीचा रोग

शांतपणे विकसित होणाऱ्या रोगांच्या विपरीत, झउजऊस्वतःला दृश्यमान आणि भावनिकदृष्ट्या त्रासदायक लक्षणांसह प्रकट करते. अनियमित किंवा अनुपस्थित मासिक पाळी, चेहऱ्यावर अनावश्यक केस, हट्टीपणे न कमी होणारे वजन आणि मनःस्थितीतील बदल अनेकदा निराशा आणि एकाकीपणाकडे नेतात. या लक्षणांना स्त्रियांनी स्वतःच आणि काही वेळा त्यांच्या आजूबाजूच्या लोकांनीही सहज दुर्लक्षित करणे हे प्रकरण आणखी गुंतागुंतीचे करते. मूळतः झउजऊ हार्मोनल असंतुलनातून उद्भवते. एंड्रोजेनची वाढलेली पातळी अंडोत्सर्ग (ovulation) बिघडवते, ज्यामुळे अनेक चयापचय आणि प्रजननविषयक परिणाम होतात. इन्सुलिन प्रतिरोध, खराब आहाराच्या सवयी, बैठी जीवनशैली, तीव्र ताण आणि विस्कळीत झोपेचे चक्र यामुळे ही स्थिती अनेकदा वाढते. या अशा वास्तविक गोष्टी आहेत, ज्या आजकालच्या अनेक तरुण भारतीय स्त्रियांच्या जीवनशैलीला परिभाषित करतात.

शरीरापलीकडचा परिणाम

PCOD चा परिणाम केवळ शारीरिक नाही. तो स्त्रीच्या मानसिक आणि भावनिक आरोग्यावर, आत्मविश्वासावर आणि अनेकदा तिच्या स्त्रीत्वाच्या भावनेवर परिणाम करतो. दुर्लक्षित राहिल्यास, यामुळे टाइप २ मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, नैराश्य, वंध्यत्व (infertility),




एंडोमेट्रियल हायपरप्लासिया आणि गर्भाशयाच्या कर्करोगासारख्या दीर्घकालीन गुंतागुंत होऊ शकतात.

तरीही, सार्वजनिक आरोग्य चर्चेत हा एक कमी प्रतिनिधित्व असलेला मुद्दा आहे. वाढत्या संख्येसमोर, मासिक पाळीच्या आरोग्याभोवतीच्या आणि हार्मोनल विकारांच्या चर्चेला कलंकमुक्त करण्याची तातडीची गरज आहे. जसे समाजाने मानसिक आरोग्य किंवा स्तनाच्या कर्करोगाच्या जागृतीसाठी एकत्र येऊन काम केले, त्याचप्रमाणे PCOD लाही दृश्यमानता आणि मुख्य प्रवाहातील लक्ष मिळायला हवे.

पुढील मार्ग

चांगली बातमी अशी आहे की, PCOD, जरी दीर्घकाळ टिकणारा असला तरी, तो व्यवस्थापित करता येतो आणि अनेक प्रकरणांमध्ये योग्य जीवनशैलीतील बदल, व्यायाम, ताण व्यवस्थापन आणि चांगल्या झोपेच्या सवयींनी तो पूर्ववत देखील होऊ शकतो. फायबर आणि लीन प्रोटीनने समृद्ध संतुलित आहार, नियमित शारीरिक हालचाल आणि जागरूक ताण व्यवस्थापनाने लक्षणे नाटकीयरित्या कमी होऊ शकतात. काही प्रकरणांमध्ये, मासिक पाळी नियमित करण्यासाठी आणि प्रजननक्षमतेला आधार देण्यासाठी वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असते. पण सर्व हस्तक्षेपांच्या केंद्रस्थानी जागरूकता हवी आहे ती स्त्रियांमध्ये, कुटुंबांमध्ये आणि आरोग्य सेवा प्रणालींमध्ये.



स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून, मी असंख्य स्त्रिया पाहिल्या आहेत, ज्या त्यांच्या शरीरामुळे पराभूत झाल्यासारखे वाटून येतात आणि ज्ञान व समर्थनाने सक्षम होऊन परत जातात. हे परिवर्तन शक्य आहे. पण ते ऐकण्यापासून सुरू होते, शरीराचे आणि ज्या असंख्य स्त्रिया स्वतःला न ऐकलेल्या (unheard) समजतात, त्यांच्या आवाजाचे ऐकण्यापासून.

आपल्याला अशी एक व्यवस्था निर्माण करायची आहे, जिथे मासिक पाळी उशिरा येण्याबद्दल बोलणे सर्दीबद्दल बोलण्याइतकेच सामान्य असेल. जिथे लहान मुलींना त्यांच्या शालेय अभ्यासक्रमाचा भाग म्हणून हार्मोनल आरोग्याबद्दल शिकवले जाईल. जिथे आरोग्य सेवा लक्षणे बिघडण्याची वाट न पाहता कृती करेल. यात, PCOD केवळ एक वैद्यकीय समस्या नाही. ती एक सामाजिक समस्या आहे. सर्व सामाजिक समस्यांप्रमाणेच, तिला जागरूकता, सहानुभूती आणि बदल घडवण्याची सामूहिक इच्छाशक्तीची गरज आहे.

- **डॉ. सुषमा कुंजीर**

(लेखिका या विश्वराज रुग्णालय, पुणे येथे सल्लागार स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत)

